जागतिक बँक सहाय्यित औद्योगिक मूल्य वृध्दीकरणासाठी कौशल्याचे बळकटीकरण करणे या केंद्रीय योजनेंतर्गत वित्तीय वर्ष २०२०-२१ करीता प्रतिबिंबित करण्यात आलेल्या तरतूदीमधून रु. ३९.६९ कोटी ( एकोणचाळीस कोटी एकोणसत्तर लाख ) निधी वितरीत व खर्च करण्यास प्रशासकीय मान्यता देणेबाबत

महाराष्ट्र शासन
कौशल्य विकास व उद्योजकता विभाग,
शासन ज्ञापन क्रमांक : स्ट्राइव्ह-२०२०/प्र.क्र. ११०/व्यशि-३,
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : २१ जानेवारी, २०२१.

संदर्भ : १) शासन निर्णय,वित्त विभाग, क्र.विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/२०१३/विनियम, भाग-२, दि. १७.०४.२०१५
२) शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्र. अर्थसं-२०१९/प्र.क्र.९२/अर्थ-३ दि. ०८.०७.२०१९
३) शासन निर्णय क्र. :जाबँप्र-२६११/प्र.क्र.१८/१९/व्यशि-५, दि. २२.०८.२०१९
४) शासन निर्णय क्र. आयटीआय-२०१९/प्र.क्र.१५६/व्यशि-३, दि. १९.०९.२०१९
५) शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्र. अर्थसं-२०१९/प्र.क्र.९२/अर्थ-३, दि. २२.०१.२०२०
६) व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयाचे पत्र क्रमांक १२/नियोजन/जा.बँ.प्र.मा/२०२०-२१/६८, दिनांक २५.११.२०२०
७) शासन निर्णय वित्त विभाग, क्र. अर्थसं-२०२० /प्र.क्र.६५/अर्थ-३ दि. ०४.०५.२०२०
८) कौशल्य विकास रोजगार व उदयोजकता विभाग, मंत्रालय, मुंबई ज्ञापन क्र. स्ट्राईव्ह २०२०/प्र.क्र.११०/व्यशि-३ दिनांक ०२.०७.२०२०
९)कौशल्य विकास रोजगार व उदयोजकता विभाग, मंत्रालय, मुंबई ज्ञापन क्र. स्ट्राईव्ह-२०२०/प्र.क्र.११०/व्यशि-३ दिनांक २६.१०.२०२०

<u>ज्ञापन :</u> जागतिक बँक सहाय्यित औदयोगिक मूल्य वृध्दीकरणासाठी कौशल्याचे बळकटीकरण करणे (STRIVE) ही केंद्र पुरस्कृत योजना राज्यात राबविण्यास संदर्भ क्र. ३ येथील शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आलेली आहे. या प्रकल्पाची अंमलबजावणी सन २०२२ या वर्षापर्यंत करण्यात येणार आहे. त्याअंतर्गत केंद्र शासनाकडून राज्य शासनास एकूण ४२.०९ कोटी निधी वितरीत करण्यात आलेला आहे. त्यापैकी रुपये २.४० कोटी निधी संदर्भ क्र. ८ व ९ अन्वये वितरीत करण्यात आलेला आहे. आता उर्वरित ३९.६९ कोटी (एकोणचाळीस कोटी एकोणसत्तर लाख) निधी वितरीत करण्यास प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्याबाबत संदर्भ क्र. ६ अन्वये संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण यांनी शासनास विनंती केलेली आहे.

२. औद्योगिक प्रशिक्षण संस्था व शिकाऊ उमेदवारी यांच्या माध्यमातून देण्यात येणाऱ्या कौशल्य प्रशिक्षणाची प्रासंगिकता व कार्यक्षमता वाढविणे या केंद्र पुरस्कृत कार्यक्रम खर्चाच्या योजनेकरीता सन २०२०-२१ च्या अर्थसंकल्पात रु. ७० कोटीची मूळ तरतूद मंजूर करण्यात आलेली आहे. केंद्र सरकारव्दारे प्राप्त ३९.६९ कोटी निधी Result Area-१ औदयोगिक प्रशिक्षण संस्थांच्या कामगिरीमध्ये सुधारणा करणे व Result

Area-२ औद्योगिक प्रशिक्षण संस्था व शिकाऊ उमेदवारी प्रशिक्षण योजना राबविण्यासाठी राज्यांची क्षमता वाढविणे याकरीता निधी खर्च करण्यारा व वितरीत करण्यास या ज्ञापनाव्दारे मान्यता देण्यात येत आहे.

३. केंद्र शासनाच्या कौशल्य विकास व उदयोजकता मंत्रालयाने दि. ०३.०१.२०१९ रोजी निर्गमित केलेल्या Operations Manual मधील मार्गदर्शक सूचनांनुसार नमूद केलेली कामे राज्य सुकाणू समितीच्या मंजूरीच्या अधीन राहून खर्च करण्यास प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

४. सदर मंजूर करण्यात येत असलेला रु. ३९.६९ कोटी (एकोणचाळीस कोटी एकोणसत्तर लाख) वितरीत निधी मागणी "मागणी क्र.झेड ए २,२२३० कामगार व सेवायोजन,१०१, औद्योगिक प्रशिक्षण संस्था,(०१) औद्योगिक मूल्य वृध्दीकरणासाठी कौशल्याचे बळकटीकरण करणे (STRIVE) (०१)(०२) औद्योगिक प्रशिक्षण संस्था व शिकाऊ उमेदवारी यांच्या माध्यमातून देण्यात येणाऱ्या कौशल्य प्रशिक्षणाची प्रासंगिकता व कार्यक्षमता वाढविणे (१०० टक्के केंद्र पुरस्कृत योजना)(कार्यक्रम) ३१, सहाय्यक अनुदाने (वेतनेतर) (२२३०ए ३५२)" या लेखाशिर्षाखाली सन २०२०-२१ या आर्थिक वर्षात उपलब्ध असलेल्या तरतूदींमधून भागविण्यात यावा. उपरोक्त खर्चाची अनुज्ञेयता तपासण्याची जबाबदारी संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय यांची राहील.

५. सदर ज्ञापन वित्त विभाग, शासन निर्णय क्र. विअप्र-२०१३/प्र.क्र. ३०/२०१३/विनियम, भाग-२, दिनांक १७.०४.२०१५ अनुसार वित्तीय अधिनियम पुस्तिका १९७८ मधील भाग पहिला, उपविभाग दोन मधील अनुक्रमांक ३ नियम क्रमांक ७; अ.क्र. ४ नियम क्र. ७; अ.क्र. २७-अ नियम क्र. ७६; अ.क्र. २८ नियम क्र.७६; अ.क्र.३७ नियम क्र. ९० अन्वये प्रशासकीय विभागास प्राप्त अधिकारानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

६. सदर ज्ञापन वित्त विभागाच्या अनौसंक्र.२३१/२०२०/व्यय-६ दि. ०१.०१.२०२१ रोजीच्या मंजूरी अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(विनोद बोंदरे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. मंत्री (कौशल्य विकास व उदयोजकता विभाग), मंत्रालय, मुंबई
२. मा. राज्यमंत्री, (कौशल्य विकास व उदयोजकता विभाग), मंत्रालय, मुंबई
३. अपर मुख्य सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
४. अपर मुख्य सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
५. सचिव, कौशल्य विकास व उदयोजकता विभाग, मंत्रालय, मुंबई
६. सह सचिव/उप सचिव, कौशल्य विकास व उदयोजकता विभाग, मंत्रालय, मुंबई
७. कक्ष अधिकारी, रोस्वरो-२, कौशल्य विकास व उदयोजकता विभाग, मंत्रालय, मुंबई
८. संचालक (व्यवसाय शिक्षण), व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
९. सर्व सहसंचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, प्रादेशिक कार्यालय, (संचालनालयामार्फत).
१०. महालेखापाल (लेखापरीक्षा) महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर.
११. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर.
१२. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी, (संचालनालयामार्फत).
१३. सर्व जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी कार्यालय, (संचालनालयामार्फत).
१४. निवड नस्ती (व्यशि-३), कौशल्य विकास व उद्योजकता विभाग, मंत्रालय, मुंबई.